
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

...य माला २०२ वें

# भारतीय सण व उत्सव

सौ. कुमुदिनी रांगणेकर



वैशाख

IRBK-0106449
IRBK-0106449

. अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २ .

स्वाध्यायमाला : पुष्प २०२ वें

प्रथम विभाग

भारतीय सण व उत्सव

# वैशाख मास

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर, मुंबई.

संपादक मंडळ

डॉ. ग. श्री. खैर, एम्.ए., पीएच्. डी.
श्री. दि. दा. गांगल, एम्.एस्सी.
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्.ए.
श्री. मु. ल. जोशी, एम्. ईडी., बी.एस्सी.
श्री. उ. र. सेवलेकर, बी.ए. (ऑ.), एम्. ईडी.
श्री. शं. दा. [illegible]

IRBK-0106449
IRBK-0106449

१८७८ ] किंमत ४० नये पैसे [ १९५७

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ति पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळांत वर्षांत येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळां त्यांतील कांहीं उत्सव घरीं साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासहि मुलें जात. त्यामुळें भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणींच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनीं सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचें सध्यांचें घटतें प्रमाण इ. मुळें आज तशी स्थिति राहिलेली नाहीं. छोटया-छोटया पुस्तिकांच्या वाचनानें ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीनें आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधीं प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोंत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नांवाजलेल्या लेखिकेनें आत्मीयतेनें सोप्या भाषेंत थोडक्यांत पुष्कळ माहिती दिली असून पुस्तिकांसाठीं योग्य अशीं चित्रेंहि श्री. गोलिवडेकरांनीं काढून दिलेलीं आहेत. बालकांना व प्रौढ साक्षरांना हीं पुस्तकें आवडतील असा आम्हांस भरंवसा आहे.

### १. मालेंतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाहि आवश्यक असें ज्ञान मालेमुळें मिळतें.
(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकांत दिलेली आहे.
(३) घरांतील खाजगी ग्रंथालयें, संघ, दल या संस्थांचीं वाचनालयें व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठीं.
(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगीं देण्यासाठीं; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगीं पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचें स्वरूप :

★ सुसंस्कृत नागरिकास असें वाटत असतें कीं, आपल्या सभोंवतालच्या वस्तु (विमान, रेडिओ, विजेची शक्ति इ.), राजकारणांतील चालू प्रश्न; थोर पूर्वजांचीं चरित्रें, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास-यांची माहिती आपणांस असावी. मालेसाठीं विषय निवडतांना वरील दृष्टि ठेविली आहे.

★ शाळेंत स्थूलमानानें ज्या विषयांचें शिक्षण होतें त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीहि या पुस्तकांतून असते.

★ मनोरंजक पद्धतीनें उपयुक्त विषयांचें ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणें हा मालेचा हेतु आहे.

अनुक्रम 22632
विभाग वा.वा
क्र. 09
30-11-8
वाचनालय

# वैशाख मास

चैत्र महिना संपला! आतां पुढला वैशाख महिना! ह्या वैशाख महिन्यासंबंधीं लहानपणीं मीं एक छान कविता ऐकली होती. तिचा कवि कोण तें मला ठाऊक नाहीं; पण ह्या दोन ओळी मात्र माझ्या मनावर बिंबल्या आहेत:—

वैशाखमासीं प्रतिवर्षि येती। आकाशमार्गी नवमेघपंक्ती॥
नेमेंचि येतो मग पावसाळा। हें सृष्टिचें कौतुक जाण, बाळा॥

हा वैशाख महिना सुरू झाला कीं दरवर्षी आकाशांत नव्या ढगांच्या ओळी दिसूं लागतात. आणि मग अगदीं ठराविक पद्धतीनें पावसाळा सुरू होतो! खरंच, सृष्टीच्या ह्या नियमितपणाचें आपल्याला फार कौतुक वाटायला हवें!

पण नुसतें कौतुक वाटून नाहीं भागणार! सृष्टीच्या—निसर्गाच्या ह्या नियमितपणापासून आपण धडा घ्यायला हवा! अन् आपल्या वागण्या-बोलण्यांत असा नियमितपणा, अशी शिस्त राखायला हवी!

मोठ्या लोकांचें—ज्यांना महात्मा ही पदवी शोभते अशा माणसांचें—एक महत्त्वाचें लक्षण सांगितलें आहे. त्यांच्या मनांत

जें वाटतें तेंच त्यांच्या तोंडून उमटतें नि तेंच त्यांच्या कृतींत दिसतें! म्हणजे त्यांचे विचार, उच्चार व आचार ह्यांच्यांत पूर्ण एकी असते!

आणि ह्याच्या उलट जे दुरात्मे, बिन-किंमतीचे असतात त्यांचें हें लक्षणहि असेंच उलट असतें!

त्यांच्या मनांत असतें एक, ते तोंडानें बोलून दाखवितात दुसरेंच आणि त्यांच्या कृतीमध्यें दिसून येतें तिसरेंच! म्हणजे कशाचा कशास मेळ नाहीं! सारी धरसोड! सारा अनियमितपणा!

पण निसर्ग महात्मा आहे! तो अत्यंत नियमितपणें वागतो! आणि त्याची दूरदृष्टीसुद्धां असते! कशी ती पहा हं!

पुढल्या ज्येष्ठापासून पाऊस सुरू व्हायचा. तर निसर्ग वैशाख महिन्यांत त्याची आगाऊ तयारी करून ठेवतो.

तहान लागल्यावर विहीर खणणें शहाणपणाचें नसतें! निसर्गाचा सगळा कारभार कसा वेळापत्रकाप्रमाणें चालतो!

वेळापत्रक कांहीं फक्त शाळेपुरतेंच नसतें. आपल्या वेळाचे व्यवस्थित वांटे करायला जें शिकवितें तें वेळापत्रक! तेव्हां शाळेंतून घरीं आल्यानंतरसुद्धां तुम्हांला वेगळें वेळापत्रक करतां येईल. आणि त्यामुळें अभ्यास, खेळ, आईवडिलांचें काम, लहान भावंडांना सांभाळणें किंवा अभ्यासांत मदत करणें असे वेळाचे वांटे करून वागतां येईल.

सुट्टीचेंसुद्धां वेळापत्रक करायला हवें! शाळा उघडल्या-नंतर होणाऱ्या अभ्यासाची सुट्टींत थोडी तोंडओळख करणें फार हिताचें ठरतें. म्हणजे निसर्ग जसा वैशाख महिन्यांत पावसाची तयारी करून ठेवतो तसेंच होईल हें! निसर्गाच्या शिस्तीपासून फार महत्त्वाचा धडा शिकल्यासारखें होईल.

उन्हाळ्यांत किंवा हिवाळ्यांत मुसळधार पाऊस पडेल का कधीं? छे: !—अन् असा पडलाच तर केवढे घोटाळे होतील, नाहीं? चक्क ऊन पडलें आहे म्हणून आईनें पापड, पापड्या, कुरडया, सांडगे करून वाळत घालावे आणि धो धो पाऊस पडावा, किंवा हिवाळ्यांत कडाक्याची थंडी पडली असतां मुसळधार पाऊस कोसळावा, कीं दांतखीळ वाजविणारी हुडहुडीच भरेल! भलताच गोंधळ होईल सगळा !

पण निसर्गाला आपली केवढी काळजी आहे! तो असा बेताल वागत नाहीं. त्याचीं सगळीं कामें कशीं वेळच्या वेळीं होतात. त्याच्या ह्या शिस्तीचें आपण कौतुक करायला हवें आणि अनुकरणहि करायला हवें. आपल्याहि वागण्या-बोलण्यांत मेळ ठेवला पाहिजे.

वैशाख महिन्यांत पावसाची पूर्वतयारी होत असते. आणि पावसाळा जवळ आला हें सुचविण्यासाठीं वळीवाच्या पावसाच्या सरी मधूनच पडतात. ह्या पावसांत घाटावरील प्रदेशांत गारा पडतात. जणूं त्यावेळीं होणारा उकाडा कमी होण्यासाठीं देवबाप्पा गमतीनें बर्फाऐवजीं गारा धाडतो !

कारण दोन महिन्यांचा एक ऋतु ह्या नियमानें चैत्र व वैशाख महिन्यांत वसंत ऋतु असतो खरा; परंतु ज्येष्ठ-आषाढांतील ग्रीष्म ऋतूचा उष्मा थोडा थोडा भासूं लागतो वैशाखांत. म्हणून तर ह्या सुमाराला—इंग्रजी मे महिन्यांत—शाळांना उन्हाळ्याची सुट्टी मिळते.

**अक्षय्य-तृतीया**

आतां वैशाख महिन्यांतला पहिला सण म्हणजे वैशाख शुद्ध तृतीया ! हिला **अक्षय्य-तृतीया** म्हणतात ! आपल्याकडे साडेतीन मुहूर्तांतला अर्धा मुहूर्त आहे हा !

दर अमावास्येला समुद्राला भरती येते खरी; पण चैत्रांतील अमावास्येनंतर येणाऱ्या अक्षय्य-तृतीयेची भरती फारच दांडगी असते असें म्हणतात!

चैत्रांत महिनाभर घरोघरीं गौरीचें हळदीकुंकू होतें. ह्या हळदकुंकू-समारंभाचा अक्षय्य-तृतीया हा शेवटचा दिवस असतो.



चैत्र शुद्ध तृतीयेला माहेरीं आलेली गौरी महिनाभर राहून अक्षय्य-तृतीयेच्या दिवशीं सासरीं परत जाते असा समज आहे.

खेड्यांतील स्त्रिया हा अक्षय्य-तृतीयेचा सण मोठ्या थाटानें साजरा करतात. ह्याला अखिती म्हणतात तीं माणसें. ह्या दिवशीं गोडाधोडाचें जेवण ते जेवतात, ठेवणींतले कपडे वापरतात आणि शेतकरी लोकांच्या कामाला या अखितीपासून सुरुवात होते.

यावेळीं शेतांतील झुडुपें तोडणें, काड्या-काटक्या वेंचणें, बीं तयार करणें, शेत नांगरणें इत्यादि कामांचा प्रारंभ होतो. नांगरणी-

नंतर पेरणी, लावणी वगैरे कामांची रांग चालू होते. शेतीचीं कामें अखंड चालू असतात. त्यांपासूनच आपल्याला धान्यधुन्य मिळतें. तेव्हां अशा महत्त्वाच्या कामाला अखितीच्या मुहूर्तावर प्रारंभ करणें योग्यच आहे !

ह्याच दिवशीं परशुराम-जयंती असते ! आपण हिंदु लोक देवाचे दहा अवतार मानतों. दशावतार म्हणतात ह्यांना.

मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध व कलंकी हे ते दहा अवतार !

पैकीं चैत्रांतील नवमीला रामजन्म होतो. आणि ह्या अक्षय्य-तृतीयेच्या दिवशीं परशुराम-जयंति येते. परशुरामानें क्षत्रियांच्या जुलुमापासून पृथ्वीचें संरक्षण केलें.

आजकाल क्षत्रियांच्या जुलुमाचें भय नाहीं. पण सर्व जगावर लष्करी जुलूम हात-पाय पसरूं पहात आहे. सत्तेची हांव वाढल्या-मुळें जगांत पुनः पुनः महायुद्धें होत आहेत. अणुबाँब-हायड्रोजन-बाँबचे शोध लावले जात आहेत. ह्यांच्या ऐवजीं जगांत शांतता, सुख आणि न्याय मिळावयास हवा, ह्यासाठीं प्रत्येकानें झटलें पाहिजे. परशुरामाच्या चरित्रापासून हा धडा घेतां येईल आपल्याला.

**सीतानवमी**

वैशाख शुद्ध नवमीला बंगालमध्यें सीतानवमी म्हणतात. ह्या दिवशीं जमीन नांगरतांना सीतादेवी सांपडली असें ते लोक मानतात. म्हणून ह्या दिवशीं--भूदान--जमिनीचें दान केल्यानें पुण्य लागतें अशी कल्पना आहे त्यांची !

विनोबाजी भावे यांच्या भूदान-यज्ञाच्या संकल्पाला ही कल्पना मदतच करील ! मोरोपंत कवींनीं आपल्या सीतागीतांत

वर्णन केलें आहे कीं--

**यज्ञासाठीं भूमी । नांगरितां धन्या ।**
**सांपडली कन्या । सीतादेवी ॥**

आपल्या महाराष्ट्रांत ह्या ओळी म्हटल्या जातात. चैत्र महिन्यांतील रामनवमीच्या निमित्तानें सीतादेवीची योग्यताहि आपल्याला कळून आली आहे, अन् तरीहि आपण ही सीतानवमी पाळीत नाहीं ! बंगाली लोकांचें पाहून आपण ही चूक सुधारायला हवी !

ह्यानंतर वैशाख शुद्ध दशमीला शंकराचार्यांची जयंती येते. श्रीमंत-गरीब, ब्राह्मण-हरिजन असा फरक मानूं नये, असें त्यांनीं शिकविलें. आपल्या हिंदु धर्मांत अनेक जाती असल्यामुळें त्यांच्यांत हेवेदावे लागतात. अन् मग तूं लहान, मीं मोठा अशीं भांडणें होतात. अशा वेळीं शंकराचार्यांचा उपदेश आपण लक्षांत ठेवावा आणि आपण सारे एक आहोंत ही भावना धरावी. म्हणजे आपल्यामधील एकी वाढेल ! अशी एकी असली कीं आपली शक्ति, अन् आपलें बळ वाढतें. ह्या एकीच्या जोरावरच शिवाजी-महाराजांनीं स्वराज्य स्थापलें ! आणि ही एकी नाहींशीं झाली, फंदफितुरी माजली म्हणूनच स्वराज्य नष्ट झालें ! पुढें पेशवाईहि नष्ट पावली ! एवढें महत्त्व एकीचें आहे.


**नारसिंह-जयंति**

त्यानंतर वैशाख शुद्ध चतुर्दशीला **नृसिंह** ऊर्फ **नारसिंह जयंती** येते. भक्त प्रल्हादाची गोष्ट ठाऊक आहे का तुम्हांला ?

हिरण्यकश्यपु नांवाच्या राक्षसाच्या पोटीं विष्णुभक्त प्रल्हादाचा जन्म झाला ! प्रल्हाद सारखा विष्णूची भक्ति करी. त्याच्या बापाला तें आवडेना. त्यानें प्रल्हादाचा नाना रीतींनीं छळ केला: पण प्रल्हाद विष्णूचें भजन-पूजन सोडीच ना.

एकदां हिरण्यकश्यपु रागानें त्याला म्हणाला,—" तुझा विष्णु जगांत सगळीकडे आहे म्हणतोस ना तूं ? मग ह्या समोरच्या खांबांत नाहीं तो कुठें दिसत ? "

" प्रल्हादानें शांतपणें उत्तर दिलें,—" त्या खांबामध्येंहि माझा विष्णु आहे ! "



हें ऐकतांच हिरण्यकश्यपूनें रागाच्या भरांत खांबावर लाथ मारली. कडकड आवाज होऊन खांब मोडला. आणि त्यांतून अर्धा सिंह व अर्धा मनुष्य अशी नृसिंहाची आकृति बाहेर आली. अन् तिनें हिरण्यकश्यपूला मारलें.

**वामनपंडित पुण्यतिथि**

ह्याच वैशाख महिन्यांत वैशाख शुद्ध षष्ठीला वामन पंडित ह्या सुप्रसिद्ध कवीची पुण्यतिथि येते. पुण्यतिथि म्हणजे ज्या दिवशीं मृत्यु झाला ती तिथि !

आणि ह्याच वामन पंडितानें नृसिंहाची वरील कथा काव्यांत सांगितली असून पुढील श्लोकांत त्यानें खांब मोडलेल्या प्रसंगाचें वर्णन केलें आहे.

**स्तंभ तो अवचितांचि कडाडी । अब्जजांड अवघेंचि कडाडी ।।**
**अब्जजादि-हृदयांत धडाडी । काल-मेघ-शत-नाद गडाडी ।।**

वामन पंडिताला रामदास यमक्या वामन म्हणत. कारण त्याला यमक जुळवून कविता करण्याचा नाद होता. वर दिलेल्या ओळींत कडाडी, धडाडी, गडाडी ह्यासारख्या उच्चाराच्या शब्दांनीं यमक साधलें आहे. पण वामन पंडिताच्या कविता मोठ्या रसाळ असत. अन् म्हणूनच तुकाराम, ज्ञानेश्वर व मोरोपंत ह्या सुप्रसिद्ध कवींच्या पंक्तीला त्याला बसविणारी खालील आर्या अनेकांच्या तोंडांत घोळते :—

**सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।**
**ओंवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंतांची ।।**

तेव्हां वामन पंडिताच्या पुण्यतिथीच्या निमित्तानें त्याच्या काव्याचा अभ्यास केला तर एकांत दोन कामें साधलीं जातील ! त्या जुन्या, थोर कवीची पुण्यतिथि साजरी होईल. आणि आपल्या कवितांचा खजिना अधिक वाढेल ! मित्रांबरोबर किंवा भांवडांबरोबर कवितांच्या भेंड्या लावतांना त्यांना जिकणें सोपें होईल !—अन् अशा रीतीनें पाठान्तर भरपूर झालें, पुष्कळ कविता वारंवार पाठ केल्या नि म्हटल्या कीं, स्मरणशक्ति आपो-आप वाढते ! म्हणजे एकांत तीन कामें होतील बघतां बघतां !

अनुक्रम २२६३२
वा. वा.
८ १९
३०-११-६०

## बुद्ध-जयन्ती

ह्या वैशाख मासांत बुद्ध-जयन्ती साजरी होते. गौतम-बुद्धांनीं बौद्ध धर्म स्थापन केला.

बौद्ध धर्माच्या अनुयायांनीं ठिकठिकाणीं डोंगर पोखरून कोरीव लेणीं तयार केलीं. वेरूळ, कार्लें इत्यादि ठिकाणचीं लेणीं प्रसिद्ध आहेत.

बुद्ध-जयन्तीच्या निमित्तानें हीं लेणीं पहाण्याची सफर अवश्य काढावी. त्यामुळें आपलें जुनें कलाकौशल्य नजरेला पडेल. कारागिरांची धर्मनिष्ठा पाहून आनंदहि होईल. ह्या दिवशीं बुद्ध-चरित्राचाहि अभ्यास करावा.

## दामाजीपंतांची पुण्यतिथि

वैशाख शुद्ध द्वादशीला दामाजीपंतांची पुण्यतिथि येते.

दामाजीपंत हा मंगळवेढें गांवाचा महालकरी होता. संसारी माणूस असूनहि तो मोठा देवभक्त होता. आपण सारीं एकाच देवाचीं लेकरें आहोंत असें त्याला वाटे. तो हें बोलूनहि दाखवी. आणि तो वागेसुद्धां तसाच ! म्हणजे तो महात्मा होता असें म्हणायला हरकत नाहीं.

एकदां मंगळवेढें गांवीं फार मोठा दुष्काळ पडला. दामाजीपंतानें आपल्या घरांतील धान्य भुकेल्या गांवकऱ्यांना मोठ्या प्रेमानें दिलें. पण तेवढ्यानें काय होणार ! आभाळालाच भोंक पडलें तर ठिगळ कसें लावणार ?

गांवांतील धान्यांचीं सरकारी कोठारें पंतांच्या ताब्यांत होतीं. पंतांच्या मनांत आलें " प्रजेकडून घेतलेल्या धान्यानें हीं कोठारें भरलीं आहेत. तेव्हां राजाप्रमाणें प्रजेचाहि त्यांच्यावर हक्क

आहे ! व ह्या कोठारांतील धान्य अशा प्रसंगीं प्रजेला देणें हें राजाचें कर्तव्य आहे. आणि राजाचा नोकर म्हणून आपण हें कर्तव्य करावयास हवें."

असा विचार करून पंतांनीं तीं कोठारें लोकांना उघडून दिलीं. पुढें ह्याचा जाब विचारण्यासाठीं सरकारी अधिकारी धांवून आले. पंतांनीं सर्व जबाबदारी स्वतःवर घेतली. त्यांना पकडून बेदरच्या बादशहाकडे नेण्यांत आलें.

पंतांवर–आपल्या भक्तावर–आलेलें हें संकट दूर करण्यासाठीं पंढरीचा विठोबा विठू महार झाला. पंतांना दरबारांत हजर करण्या आधीं तो स्वतः पंतांचा नोकर म्हणून दरबारांत आला. त्यानें आपल्या घोंगडीच्या आंत ठेवलेली पिशवी बाहेर काढली.



व धान्याची पुरी किंमत बादशहाला देऊन टाकली. त्यावेळीं क्षणभर विठू महाराच्या जागीं बादशहाला विठोबाची किरीटकुंडलांनीं सजलेली मूर्ति दिसली ! अन त्याला त्या विठू महाराचें जणूं वेड लागलें ! पण विठू महार केव्हांच दिसेनासा झाला होता.

अमृतराय नांवाच्या एका कवीनें एक सुंदर गाणें केलें आहे. देवानें आपल्या भक्तांसाठीं किती त्रास घेतला त्याचें वर्णन त्यांत आहे. ह्या प्रसंगाबद्दल ' दामाजीची रसीद पटविली ' असें कवीनें म्हटलें आहे. म्हणजे दामाजीनें लोकांना धान्य लुटूं दिलें. नि त्याची रसीद–पावती–देवानें दिली. भक्ताला मदत करण्यासाठीं देव महार झाला ! हरि हरिजन झाला ! देवाला ह्यांत कमी-पणा वाटला नाहीं ! मग आपण एकमेकांना कमी लेखणें चुकीचें नाहीं का ? देवाच्या दृष्टीनें आपण सर्व सारखे आहोंत. तो हेंच वेगवेगळ्या रीतीनें शिकवीत असतो आपल्याला.

**शंकराचार्यांची जयंती**

शंकराचार्यांनीं सुद्धां हेंच शिकविलें. आपल्या वागणुकींत त्यांनीं हेंच दाखविलें. त्यांचें एकंदर आयुष्यच अजब आहे !

हिंदुधर्माप्रमाणें पुरुषजातीला चार आश्रम--आयुष्याचे चार भाग--नेमून दिले आहेत. पहिला ब्रह्मचर्याश्रम. ह्या भागांत शिक्षण घ्यावयाचें.

दुसरा गृहस्थाश्रम. ह्या भागांत विवाह करून संसार चालवावयाचा. गृहस्थ व्हावयाचें. गृहस्थ ह्या शब्दाचा मूळ अर्थ गृहांत म्हणजे घरांत राहतो तो, असा आहे. घरांत रहाणें म्हणजे संसाराची जबाबदारी घेणें. तेव्हां गृहस्थ ही जबाबदार व्यक्ति असते; पण आजकाल आपण माणूस ह्या अर्थीं सर्रास हा शब्द वापरतों.

ह्यानंतरचा तिसरा आश्रम म्हणजे वानप्रस्थाश्रम. हळूहळू संसारांतील मन काढून घ्यावयाचें. मुलाबाळांच्या अंगावर जबाब-दाऱ्या टाकायच्या आणि रानावनांत हिंडून ईश्वराचें चिंतन करीत आयुष्य घालावयाचें. परंतु संसाराचा संबंध अजिबात सुटत नाहीं ह्या आश्रमांत.

शेवटच्या संन्यासाश्रमांत मात्र संसाराचा संबंध पार सोडायचा ! बायकोमुलांचें नातें तोडायचें. जगांतील इतर लोकांसारखी व त्यांच्यावर असते तेवढीच आपुलकी नातलगांबद्दल मानायची !

अशा रीतीनें टप्प्याटप्प्यानें संन्यास घ्यावयाचा असतो. पण शंकराचार्य साधे मनुष्य का होते ? मोठ्यांचें सारेंच मोठें !

ब्रह्मचर्याश्रमांतून सरळ शेवटल्या संन्यासाश्रमांत उडी मारूं पहात होते ते ! संसाराचा डाव मांडणेंहि नको ! नि तो सोडून जाणेंहि नको ! बस्स ! लग्नच करायचें नाहीं !

पण त्यांच्या विधवा आईला हें पटेना. श्रीशंकराच्या कृपेनें हा एकुलता एक मुलगा झालेला. त्यांतून तो कमालीचा हुषार ! एकपाठी होते शंकराचार्य ! एकदां गुरूंनीं शिकविलें कीं ह्यांचें पाठ झालेंच !

अन् असा सोन्यासारखा मुलगा लग्नकार्य न करतां संन्यासी होणार ! आई कांहीं या गोष्टीला परवानगी देईना.


शेवटीं एक आश्चर्यकारक गोष्ट घडली. नि आईनें त्यांना परवानगी दिली.

एके दिवशीं पहांटे नेहमींप्रमाणें शंकराचार्य पूर्णा नदीवर आंघोळीला गेले होते. अन् नदींतील मगरीनें त्यांचा पाय पकडला. ही बातमी श्रीअंबिकेच्या––शंकराचार्यांच्या आईच्या––कानावर आली. तशी ती धांवत-पळत नदीच्या कांठावर आली. नि बापडी रडूं लागली.

शंकराचार्य म्हणाले, ––"आई, ही मगर मला सोडत नाहीं; पण संन्यास घेण्याची परवानगी तूं देत असशील तर कदाचित् ही सोडील."

त्यांच्या प्रेमळ आईनें चटकन् परवानगी दिली. आणि आश्चर्य असें कीं, मगरीनें लगेच त्यांचा पाय सोडला !

पुढें त्यांनीं संन्यास घेतला. जगन्नाथपुरी, बदरीनारायण, द्वारका आणि शृंगेरी ह्या चार कोपऱ्यांतील चार शहरीं त्यांनीं मठ



स्थापन केले. व काशीच्या विद्वान् पंडितांनाहि त्यांनीं वादविवादांत जिंकलें. हीं झालीं बुद्धीचीं कामें. पण ह्याखेरीज त्यांनीं फार महत्त्वाचें असें आणखी एक काम केलें. आणि त्यामुळें त्यांच्या हृदयाचा प्रेमळपणा दिसून आला. नरमेध करण्याची घातकी रूढि त्यांनीं बंद पाडली.

नरमेध म्हणजे यज्ञांत पशूचा बळी देतात तसा माणसाचा बळी देणें ! केवढा क्रूरपणा ! पण पूर्वींपासून चालत आलेली रूढि म्हणून ती चालू ठेवली होती लोकांनीं ! शंकराचार्यांना तें आवडेना ! माणसानें माणसाला मारावयाचें ? छे: ! आपण सारे भाऊ, भाऊ आहोंत !

त्यावेळेपासून ही दुष्ट रूढि--ही क्रूर पद्धत--नाहींशी झाली! त्यांच्या ह्या कृतीमुळें त्यांच्याबद्दल लोकांना अधिकच आदर वाटूं लागला!

अन् वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी त्यांनीं बदरीकेदार येथें समाधि घेतली.

**चोखामेळा पुण्यतिथि**

आतां वैशाख महिन्यांतील शेवटची महत्त्वाची तिथि! वैशाख वद्य त्रयोदशी! चोखामेळ्याची पुण्यतिथि आहे ही!

चोखामेळा जातीनें महार!--हरिजन! एकदां मंगळवेढें गांवाच्या भोंवतीं तटाच्या भिंती बांधण्याचें काम निघालें. बादशहानें गरीब हरिजनांना वेठीस धरण्याची आज्ञा केली. म्हणजे त्यांनीं गांवांतील रस्त्यावरून चोरासारखें चालावयाचें. गांवाबाहेरील उकिरडयावर रहावयाचें. आणि त्यांना गांवांतून हद्दपार करणाऱ्या—दूर लोटणाऱ्या—भिंतीसुद्धां त्या हरिजनांनींच बांधावयाच्या! हंऽ!

अन् ही भिंत बांधतांना गवंडयांनीं गोंधळ केला, किंवा भिस्त्यानें पाणी अधिक ओतल्यामुळें चिखल पातळ झाला, किंवा अधिकाऱ्यांनीं घाई केली; कोणत्याहि कारणानें असो; पण बांधतां, बांधतां भिंत कोसळली आणि हरिजनांची एक तुकडी त्या भिंतीखालीं गेली. त्यांतच चोखोबाहि होता.

चार लोक हळहळले. पण त्या मरणाऱ्या लोकांना त्यांनीं त्या ढिगाखालींच मरूं दिलें! त्या मातीखालीं त्यांचीं प्रेतें कुजलीं. हीच मूठमाती मिळाली त्यांना! पुढें चोखोबाचे अभंग वाचून नामदेव नांवाच्या संताला खेद वाटला. तो मंगळवेढयाला आला. त्यानें तो मातीचा ढीग खणावयास सुरुवात

केली. त्याला कितीतरी हाडें सांपडलीं. प्रत्येक हाड घेऊन तो कानाशीं लावी. आणि ज्या हाडांमधून 'विठ्ठलऽविठ्ठल' असा आवाज येई तें चोखोबाचें म्हणून वेगळें काढी. अशा रीतीनें त्यानें सर्व हाडें शोधून काढलीं व त्यांवर समाधि बांधली.

चोखोबानें आपल्या हयातींत सुरेख अभंग रचले होते. हरिजन असून त्याची वाणी शुद्ध मराठी होती. त्याचे अभंग करुणरसानें थबथबले आहेत, जातिभेदापायीं होणाऱ्या जुलुमामुळें वैतागले आहेत; पण ईश्वराच्या प्रेमळपणावर विश्वास ठेवणारे आहेत.

**'ऊंस डोंगा परी, रस नोहे डोंगा।**
**काय भुललासी वरलिया सोंगा ॥'**

हा चोखाबाचा अभंग फार प्रसिद्ध आहे.

चोखाबा म्हणतो--ऊंस डोंगा असेल. दिसावयाला खडबडीत व वाईट असेल; पण आंतला रस डोंगा नसतो ना? तो मधुर असतो ना? मग वरच्या सोंगाला कां महत्त्व द्यावयाचें?

आपण अनेकदां बाहेरच्या भपक्याला भुलतों नि त्यामुळें फसगत होते आपली. 'दिसतें तसें नसतें नि म्हणूनच जग फसतें' अशी म्हणच आहे ना?

**परशुराम-जयंती**

अक्षय्य-तृतीयेलाच परशुराम जयंती येते. परशुराम हा देवाचा अवतार तर होताच; पण हनुमानाप्रमाणें तोहि शारीरिक बळाचें अधिदैवत होता. तो स्वतः मोठा पराक्रमी होता आणि मातृ-पितृ-भक्त होता.

परशुरामाच्या बापाचें नांव जमदग्नि व आईचें नांव रेणुका. जमदग्नि भयंकर रागीट होता. बापाचा हा गुण परशुरामाच्या अंगांत उतरलाच होता. तोहि तापट होता.

एकदां जमदग्नि रेणुकेवर चिडला व त्यानें तिला ठार मारण्याची परशुरामाला आज्ञा केली. बापाची आज्ञा पाळण्यासाठीं परशुरामानें आपल्या आईला ठार मारलें. जमदग्नि त्यामुळें खूष झाला व त्याला काय हवें तें मागण्यास सांगितलें. त्याबरोबर आपल्या आईला जिवंत करण्याची विनंति परशुरामानें केली. अन् रेणुका परत जिवंत झाली. अशा रीतीनें परशुरामानें आपली मातृ-पितृ-भक्ति व्यक्त केली.

पुढें कार्तवीर्य सहस्रार्जुन नांवाच्या एका क्षत्रिय राजानें जमदग्नीचा वध केला. त्यामुळें चिडून परशुरामानें पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची--पृथ्वीवर एकहि क्षत्रिय जिवंत न ठेवण्याची—प्रतिज्ञा केली आणि ती बऱ्याच अंशीं पार पाडली.

क्षत्रियांनीं त्या काळीं आपल्या सत्तेच्या जोरावर धुमाकूळ चालविला होता ! असा सत्तेचा वाईट उपयोग केला म्हणजे नाश ठरलेलाच !

तेव्हां परशुरामाच्या चरित्रावरून आपण हा बोध घ्यावयाचा कीं, शक्य तेवढी शक्ति वाढवावी प्रत्येकानें. ह्या शक्तीच्या मदतीनें अन्याय दूर करतां येतो. तेव्हां हें ध्येय ठेवूनच शक्ति वाढवावी. मात्र त्या शक्तीचा गैर उपयोग करूं नये !

परशुरामाला आपल्या शक्तीचा गर्व चढला. एकाद्या पिसाटासारखा तो हात धुऊन क्षत्रियांच्या मागें लागला. ह्याचा परिणाम असा झाला कीं, पृथ्वीचें पालन व रक्षण करावयास एकहि क्षत्रिय जाग्यावर उरला नाहीं. तेव्हां काश्यप मुनींनीं, भीतीनें रानावनांत पळून गेलेल्या क्षत्रियांना परत बोलाविलें. आणि पुनः 'येरे माझ्या मागल्या' होऊं नये म्हणून परशुरामालाच पृथ्वी सोडून जाण्याची आज्ञा केली. तेव्हांपासून परशुराम महेंद्र पर्वतावर राहूं लागला.

जातीनें ब्राह्मण असणाऱ्या परशुरामानें हातांत परशु--कुऱ्हाडीसारखें हत्यार--घेऊन आपल्या शक्तीचा वाईट उपयोग केल्यामुळें त्याच्यावर हा प्रसंग ओढवला.

### मल्हारराव होळकर पुण्यतिथि

इंदूरचें राज्य ह्यानें स्थापन केलें. हा जातीनें धनगर असून पुणें जिल्ह्यांतील होळ गांवचा रहाणारा. तेथून तो खानदेशांत आपल्या मामाच्या गांवीं गेला. पुढें बाजीराव पेशव्यांनीं त्याला साधारण शिपाई म्हणून सैन्यांत घेतला. पण आपल्या अंगांतील हुषारीनें हा चढत गेला.

पेशव्यांच्या वतीनें त्यानें रोहिल्यांचा पराभव केला. त्यामुळें मराठ्यांचा मान वाढला. आणि दिल्लींतील मोंगल बादशहाला मराठ्यांचा वचक वाटूं लागला.

त्याच्या मुलाचें नांव खंडेराव. सुप्रसिद्ध अहिल्याबाई होळकर ही खंडेरावाची बायको व मल्हाररावाची सून!

पानिपतच्या लढाईंत मल्हारराव हजर होता. पण शेवटीं पळापळ झाली. आणि पेशव्यांचीं बायकामुलें सुरक्षित नेण्याचें जबाबदारीचें काम ह्याच्यावर सोंपविलें होतें. त्यानें इंदूरला स्थापन केलेलें राज्य पुढें अहिल्याबाईनें चांगलें नांवारूपाला आणलें. वैशाख शुद्ध एकादशीला मल्हारराव होळकर मरण पावले.

### राम गणेश गडकरी जयन्ती

ह्याच वैशाख महिन्यांत महाराष्ट्रांतील एका थोर कवीचा जन्म झाला. त्यांचें नांव राम गणेश गडकरी.

त्यांच्या कवितांचा संग्रह त्यांच्या मरणानंतर छापण्यांत आला, त्या संग्रहाचें नांव 'वाग्वैजयंती' असें आहे. ते 'गोविंदाग्रज'

ह्या नांवानें कविता लिहीत असत. त्यांच्या कवितांपैकीं ' राजहंस माझा निजला ' ही कविता फार प्रसिद्ध आहे. ते करुण प्रसंग उत्तम रंगवीत नि विनोदहि छान लिहीत. त्याचप्रमाणें ते गंभीर लिखाणहि करीत. ' राजहंस माझा निजला ' ही करुण कविता आहे आणि त्यांची ' श्रीमहाराष्ट्र गीत ' ही कविता गंभीर असून मोठी सुंदर व स्फूर्तिदायक आहे.



राम गणेश गडकरी

गडकरी कवि होते आणि नाटककारहि होते. त्यांनीं सात नाटकें लिहिलीं. त्या सर्वांत त्यांचें ' एकच प्याला ' नाटक विशेष गाजलें. हें नाटक पहातांना प्रेक्षक खळखळ अश्रू गाळतात; तर त्यांचें ' भावबंधन ' नाटक पहातांना प्रेक्षक खदखदून हंसतात. हीं दोन्हीं नाटकें अजून लोकप्रिय आहेत.

गडकऱ्यांची भाषा कधीं कधीं समजावयाला थोडी अवघड वाटते. परंतु ती नेहमींच कानाला मोठी डौलदार लागते. ते विनोदी कोटचा करीत असत; आणि पुष्कळ लेखकांनीं त्यांच्या लिहिण्याच्या शैलीचें--पद्धतीचें--गेल्या चाळीस वर्षांत अनुकरण केलें आहे. ते लेखक मोठ्या आवडीनें स्वतःला गडकरी-भक्त म्हणतात. ह्यावरून गडकरी किती थोर लेखक होते हें कळून येतें.

गडकऱ्यांच्या कांहीं कविता विनोदी आहेत. आणि भावबंधन नाटकांत इंदू, बिंदू व कामण्णा ह्या पात्रांचा मजेशीर विनोद आहे. प्रेमसंन्यास नाटकांतील विसरभोळ्या गोकूळचें पात्र म्हणजे मूर्तिमंत विनोद. आणि पुण्यप्रभाव नाटकामध्यें कंकण, किंकिणी व नूपूर ह्या तिघांभोंवतींचा विनोदहि गंमतीचा आहे.

२२६३२ वा.ग्रं. ८९८ ३०-११-५

पण ह्याशिवाय गडकऱ्यांनीं 'बाळकराम' हें टोपणनांव घेऊन कांहीं खास विनोदी लिखाण लिहिलेलें आहे. तें 'रिकामपणची कामगिरी' ह्या पुस्तकांत एकत्र छापलें आहे.

एवढें सर्व लिखाण गडकऱ्यांनीं अवघ्या नऊ वर्षांत केलें. दुर्दैवानें ते वयाच्या चौतिसाव्या वर्षी--सन १९१९ मध्यें--वारले. त्यामुळें त्यांच्या हयातींत त्यांच्या गुणांचा योग्य गौरव होऊं शकला नाहीं. पण महाराष्ट्रांतील गांवोगांवीं त्यांचा स्मृतिदिन अजून पाळला जातो. गडकऱ्यांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि मराठी लेखकाच्या वांट्याला हें भाग्य आलेलें नाहीं! गडकरी लौकर मेले; पण 'मरावें परि कीर्तिरूपें उरावें' ही रामदासांची उक्ति त्यांनीं खरी केली.

मरणाच्या अर्धा तासच आधीं त्यांनीं भावबंधन नाटकाचा शेवटचा प्रवेश पुरा करून लेखणी खालीं ठेवली होती!

अशा ह्या थोर नाटककार व कवीचें आपण ह्या वैशाख महिन्यांत आदरानें स्मरण करूं या. ह्या महिन्यांत त्यांचें थोडेंतरी लिखाण प्रत्येकानें वाचावें. आणि त्यांचें 'श्रीमहाराष्ट्र गीत' पाठ करावें. म्हणजे त्यांनीं मराठी भाषेवर केलेल्या उपकारांची थोडी फेड होईल!

**बालकवि पुण्यतिथि**

आतां ह्याच वैशाखमासांत मरण पावलेल्या दुसऱ्या एका थोर कवीची माहिती ऐका. ह्या कवीचें नांव त्र्यंबक बापूजी ठोमरे. परंतु ते **बालकवि** ह्या नांवानेंच प्रसिद्ध आहेत.

१९०७ सालीं जळगांवला महाराष्ट्रांतील कवींचें संमेलन भरलें होतें. जुने सुप्रसिद्ध कवि कर्नल कीर्तिकर अध्यक्ष होते. महाराष्ट्रांतील मुख्य, मुख्य कवि हजर होते. त्यांनीं आपापल्या

कविता म्हणून दाखविल्या. आणि नंतर सतरा वर्षांचे ठोमरे व्यासपीठावर चढले. आणि त्यांनीं मोठ्या धिटाईनें आपण रचलेल्या कविता म्हटल्या.



बालकवि

श्रोते चकित झाले. अध्यक्ष भारी खूष झाले. नि त्यांनीं त्याला **बालकवि** ही पदवी दिली. आणि ह्या नव्या नांवानेंच ते प्रसिद्धि पावले.

बालकवींची वृत्तीहि बालासारखीच साधी होती. त्यांचा स्वभाव मनमोकळा व निष्कपटी होता. आणि कधीं कधीं लहान मुलासारखेच ते एकदम चिडत नि लगेच थंड होत.

बालकवींना आपल्या कविमित्रांबद्दल फार जिव्हाळा वाटे. गडकरी व ते एकमेकांना वारंवार भेटत. एकमेकांचें लिखाण एकमेकांना वाचून दाखवीत. गडकऱ्यांना बालकवींच्या कविता फार आवडत आणि बालकवींना गडकऱ्यांचीं नाटकें भारी आवडत.

बालकवींना **निसर्गाचे कवि** म्हणत. त्यांना सृष्टि, पाणी, चंद्रप्रकाश फार प्रिय वाटत. 'फुलराणी', 'अरुण', 'निर्झरास' व 'आनंदी आनंद गडे' ह्या त्यांच्या कविता लोकप्रिय आहेत. 'आनंदी आनंद गडे' ह्या कवितेंत तर बालकवींनीं निसर्गाचें भारी सुरस वर्णन केलें आहे.

सोनेरी सूर्यकिरण, निळेंभोर आकाश, वहाणारा झरा वगैरे निसर्गाच्या प्रत्येक गोष्टींत कवीला आनंद भरलेला आढळतो. अन् तें वाचतांना आपलें मनहि आनंदित होतें.

अनुक्र २२६३२
बा.क
८१८
30-99

आनंदी आनंद गडे ।
इकडे तिकडे चोहिंकडे ॥

पण निसर्गावर प्रेम करणाऱ्या बालकवींना मृत्यु मात्र अनैसर्गिक आला. अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी अपघाती मरण आलें त्यांना. आगगाडीचे रूळ ओलांडतांना पाय अडखळून ते खालीं पडले. त्याच वेळीं मागून मालगाडी आली आणि त्यांच्या अंगावरून गेली !

ऐन तारुण्यांत बालकवि मरण पावले ! पण कीर्ति आयुष्याच्या लांबीवर अवलंबून नसते ! आयुष्यांतील कर्तृत्वावर ती अवलंबून असते. बालकवींनीं अवघ्या अठ्ठावीस वर्षांत अपार कर्तृत्व केलें. नि त्यांची कीर्ति अजरामर झाली ! त्यांच्या काव्याच्या रूपानें ते चिरंजीव झाले ! त्यामुळें मराठी भाषा जिवंत असेपर्यंत त्यांची कीर्ति कायम राहील.

## आधुनिक काळांतील वैशाखाचें महत्त्व

आतां वैशाख महिन्याच्या वेगळ्या महत्त्वाच्या बाजू बघू या हं. ह्या महिन्यांत उन्हाळ्याची सुटी असते. नि सुट्टींत गांवाला जातात बहुधा. कोणी आजोळीं जातात, कोणी काकाकडे, कोणी स्नेही मंडळीकडे. आणि कोणीं भाड्यानें बंगला घेऊन महाबळेश्वर, माथेरान, उटकमंड, दार्जिलिंग, खंडाळें, लोणावळें ह्या ठिकाणीं जातात.

मिळून काय, वैशाखांत हवापालट मिळते. जीं माणसें ह्या दिवसांत परगांवीं जात नाहींत त्यांच्याकडे परगांवाहून पाहुणे येतात. नि हवापालट न मिळाला तरी थोडा थारेपालट होतो त्यांना.


ज्यांचें आजोळ कोंकणांत असतें त्यांची ह्या दिवसांत मोठी चंगळ होते. आंबे, फणस, काजू ह्यांची रेलचेल असते. नंतर आंबेपोळ्या नि फणसपोळ्याहि मिळतात.

एकंदरींत वर्षभरांत केलेल्या श्रमांची झीज भरून निघते ह्या महिन्यांत. फुलांचीहि रेलचेल असते हं. मोगरी नि सुरंगी ह्या सुवासिक फुलांना बहर येतो !

ह्याच महिन्यांत लग्नांचा मोसमहि प्रथम सुरू होतो. आपल्या नात्यांतच लग्न निघालें म्हणजे धांदल विचारूंच नका. पण एरवींहि रस्त्यावरून शृंगारलेल्या मोटारींतून वरात जातांना पहावयाला मौज वाटते. ती रोषणाई नि तें दारूकाम ! खरं ना? तेव्हां अशा अनेक प्रकारें वैशाख महिन्याचें महत्त्व पटतें.

### स्वाध्याय

(१) नारसिंहानें हिरण्यकश्यपूला कां ठार मारलें ?
(२) विठू महारानें दामाजीची ' रसीद ' कशी पटविली ?
(३) श्रीमत् शंकराचार्यांनीं संन्यास घेण्यासाठीं आईची परवानगी कशी मिळविली ?
(४) परशुरामाच्या चरित्रावरून तुम्ही काय बोध घ्याल ?
(५) खालील व्यक्तींबद्दल माहिती द्या :—
(अ) राम गणेश गडकरी, (ब) बालकवि, (क) चोखामेळा.



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
वा. क्र. 6448 नो. दि.
वि. साधा
IRBK-0106449
IRBK-0106449